## स्वर्गीय नारायण मेघाजी लोखंडे
## कामगार शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र
(महाराष्ट्र सरकार)

## यशाच्या कथा गोष्टी

# बदल घडविलेले तारे

## कामगार अभ्यास प्रशिक्षण (MLS)
## मुंबई विद्यापीठ

MAHARASHTRA INSTITUTE OF LABOUR STUDIES

सत्यमेव जयते

१९१७-२०२२

प्लॅटिनम जुबली

७५

वर्षे

# संस्थापक



श्री. ना. मे. लोखंडे



श्री. गुलझारीलाल नंदा

स्वर्गिय  नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र कामगार शैक्षणिक संस्था दि. ७ जुलै १९४७ साली तेव्हाचे कामगार मंत्री (मुंबई सरकार) भारतरत्न विभूषित श्री. गुलझारीलाल नंदा यांच्या मार्गदर्शनाखाली तेव्हाचे मँचेस्टर म्हणून प्रसिद्ध असलेले परळ – मुंबई या ठिकाणी "मुंबई कामगार संस्था (बॉम्बे लेबर इंस्टीट्युट)" या नावाने प्रस्थापित झाली. ही संस्था औद्योगिक संबंध आणि मानवी भांडवल व्यवस्थापन क्षेत्रातील आद्य संशोधक संस्था आहे.

वरील संस्थेला गेल्या ७५ वर्षांचा गौरवशाली वारसा लाभलेला असून, संस्थेने मानवी संसाधन आणि औद्योगिक संबंध या क्षेत्रात अनेक नामवंत दिग्गज तयार केले आहेत. संस्थेच्या कठीण अभ्यासक्रमास मुंबई विद्यापिठाने मान्यता दिलेली असून त्यांच्या तर्फे एमएलएस (MLS) ही पदवी प्रदान केली जाते.

ह्या संस्थेचा मूळ उद्देश तरुण व तडफदार व्यावसायिकांची निर्मिती करुन त्यांना मानवी संसाधन क्षेत्रातील कामगार कायदे, औद्योगिक संबंध, मानवी संसाधन व्यवस्थापन आणि व्यावसायिक दृष्टीकोन यांचा अनुभव देणे हा आहे. हा २ वर्षांचा पुर्णवेळ पदवी अभ्यासक्रम आहे.

संस्थेचे माजी विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर जागतिक उदयोगात चांगले योगदान देत असून त्यांनी यशाची विविध शिखरे गाठली आहेत.

# अनुक्रमणीका


| अनु.क्र. | यशदाई व्यक्तिमत्त्वाचे नाव | एमएलएस बॅचचे वर्ष | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री.श्रीकृष्ण भावे | १९७९-८१ | ५ |
| २. | श्री.शरद गांगल | १९८२-८४ | ६ |
| ३. | श्री.प्रभाकर पाटील | १९८८-९० | ७ |
| ४. | श्री.राजेश बागवे | १९८८-९० | ८ |
| ५. | डॉ.राज पांड्या | १९९१-९३ | ९ |
| ६. | श्री.क्लिफर्ड पै | १९९२-९४ | १० |



# श्री. श्रीकृष्ण भावे

श्री. श्रीकृष्ण भावे हे ३८ वर्षांचा उत्तम अनुभव असलेले मानव संसाधन विकास क्षेत्रातील ज्येष्ठ  व्यक्ती आहेत. त्यांनी B.Sc रसायनशास्त्र (ऑनर्स) , एमएलएस (मास्टर ऑफ लेबर स्टडीज) - १९८१ (मुंबई विद्यापीठाहून एच आर / पर्सोनेल मॅनेजमेंट, ओबी, औद्योगिक संबंध(ई आर) मध्ये स्पेशलायझेशन) , एलएलबी – २००० हे शिक्षण घेतलेले आहे. फेब्रुवारी २०१३ मध्ये "भारतातील ४० सर्वात प्रतिभावान मानव संसाधन ( एच आर) लीडर्स' साठी 'ईटी नाऊ ( ET NOW)' पुरस्कार ही त्यांना आजवर मिळालेली सर्वात मोठी व्यावसायिक मान्यता आहे

मार्च २०२० ते मार्च २०२२ या कालावधीसाठी फोर्ब्स अँड कंपनी लिमिटेड सोबत सल्लागार प्रमुख (हेड) - ह्युमन रिसोर्सेस म्हणून कार्य सांभाळल्यानंतर, ते सध्या स्वतंत्र सल्लागार आहेत. त्यापूर्वी जानेवारी २०२० मध्ये  त्यांच्याबरोबर डायरेक्टर - मानव संसाधन म्हणून सेवानिवृत्त झाले. ते फोर्ब्स अँड कंपनी 'सिनेट' (व्यवस्थापन समिती) चे एक भाग होते आणि मंडळाच्या सभांना कायमचे निमंत्रित होते. १९८१ ते २०१३ पर्यंत, त्यांनी एल अँड टी मध्ये व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी (मॅनेजमेंट ट्रेनी) , प्रॉक्टर आणि गॅम्बलमध्ये (Procter and Gamble) पर्सोनेल ऑफिसरची भूमिका आणि ॲबॉट हेल्थकेअर (प्रमुख) अमेरिकन बहुराष्ट्रीय फार्मा कंपनी (एबॉट) चे संचालक - मानव संसाधन सारखे विविध एच आर/ई आर भूमिकांमध्ये काम केले. ज्या इतर नामांकित कंपन्यामध्ये त्यांनी काम केले, त्या एचसीसी, रिलायन्स, मोदी एंटरप्रायजेस, आयसीआय इंडिया लि.

स्ट्रॅटेजिक मानव संसाधन, संस्था/कंपनी संरचना,काम मुल्यमापन, वेतन संरचना या क्षेत्रात त्यांनी व्यापक कार्य केले आहे. त्यांनी मॅककिन्से अँड एक्सेंचर कंपनीची क्षमता निर्माण प्रकल्प, संस्था/ कंपनी शिक्षण आणि विकास प्रकल्प (अग्रगण्य जागतिक कंपनी डीडीआयच्या वरिष्ठ नेतृत्वासाठी) अशा क्षमता निर्मिती प्रकल्पावर काम केले. आणखी एक भर म्हणून त्यांना लेबर युनियन/मल्टी-युनियन संस्थेच्या व्यवस्थेमधील औद्योगिक संबंधांचा विस्तृत अनुभव/विशेषज्ञता आहे. नुकत्याच जुलै २०१९ मध्ये झालेल्या करारांसह त्यांनी अनेक दीर्घकालीन समझोत्या/करारांवर स्वाक्षऱ्या केल्या.

ते एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया, बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स, (ओ.पी.पी.आय.) - प्रमुख फार्मा एम्प्लॉयर्स असोसिएशन - विविध एचआर समित्यांचे सदस्य आहेत. ते नॅशनल एचआरडी नेटवर्क आणि सोसायटी फॉर ह्युमन आणि रिसोर्स मॅनेजमेंट (एसएचआरएम) चे सदस्यही आहेत. टी.आय.एस.एस.आणि विविध चेंबर्स ऑफ कॉमर्स, फोरम फॉर इमोशनल इंटेलिजन्स (एफईआयएल) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिष्ठित सीएलओ चीफ लर्निंग ऑफिसर्स परिषदेसह, विविध प्रमुख चर्चासत्रे आणि परिषदांमध्ये ते वक्ते होते.

सामाजिक क्षेत्रात ते रोटरी क्लबचे सक्रिय सदस्य आहेत. पवई येथे समाजसेवा प्रकल्पांमध्ये मोठे योगदान दिल्याबद्दल सन २००१-२००२ मध्ये त्यांना 'बेस्ट रोटेरियन ट्रॉफी' प्रदान करण्यात आली. टाईम्स ऑफ इंडिया शील्ड स्पर्धा, ई मर्क शील्ड स्पर्धा इत्यादींमध्ये पी अँड जी आणि आयसीआयसाठी क्रिकेटचे प्रतिनिधित्व करून खेळलेले खेळाडू म्हणून ते एक उत्साही खेळाडू आहेत.



# श्री. शरद गांगल

श्री. शरद गांगल हे एक गतिमान मानवी संसाधन (एचआर) व्यावसायिक आहेत.ज्यांची ३४ वर्षांची कारकीर्द विविध इंडस्ट्री जसे की फार्मास्युटिकल, एफएमसीजी, वित्तीय सेवा (लाइफ इन्शुरन्स) आणि अभियांत्रिकी मानवी संसाधन कार्यांमध्ये आहे. या प्रवासादरम्यान त्यांचा मानवी संसाधनच्या (एचआरच्या) सर्व उप-शाखांशी संपर्क आला, ज्यामध्ये मानवी संसाधनचे (ह्युमन रिसोर्सेसचे) जनरल मॅनेजर/प्रमुख म्हणून लीडरशिप पोझिशन्समध्ये १५ वर्षांचा समावेश आहे.

मुंबई विद्यापीठाच्या "महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीज" (१९८२-८४) मधून ते पदव्युत्तर आहेत. जागतिक ख्याती असलेल्या विविध संस्थांमध्ये त्यांनी गुणवत्ता व्यवस्थापकपासून ते कर्मचारी संबंधापर्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्या आहेत. १९९६ मध्ये त्यांनी कॅडबरी मधून जनरल मॅनेजर म्हणून आणि नंतर एचडीएफसी लाइफ इन्शुरन्समध्ये प्रमुख (हेड) एचआर म्हणून त्यांच्या अनुभवी नेतृत्वाच्या भूमिकेची सुरुवात केली आणि त्यानंतर जून २०२० पर्यंत थरमॅक्स (Thermax) कंपनीमध्ये कार्यकारी उपाध्यक्ष तसेच कार्यकारी परिषदेचे ( Executive Council) सदस्य म्हणून काम केले आहे.

बेनेट कोलमन टाइम्स ऑफ इंडिया, मुंबई येथून कल्याण अधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली होती. एशियन पेंट्स, बोहेरिन्गेर मॅनहाइम (मूळतः Boehringer Knoll), कॅडबरी इंडीया, कॅडबरी स्वेपेस, ब्रिटिश केपीओ-कॅपीटा, एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स आणि थरमॅक्स (Thermax) कंपनीमध्ये कार्यकारी उपाध्यक्ष - मानवी संसाधन म्हणून काम केले.

अध्यापन हा त्यांचा आवडीचा विषय आहे. ते सध्या टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स (TISS) सारख्या शैक्षणिक संस्थांशी निगडीत आहे, जिथे गेल्या ५ वर्षांपासून ते एचआर विद्यार्थ्यांसाठी निगोशिएशन मॅनेजमेंट/ तुलनात्मक कर्मचारी संबंधांचा अभ्यासक्रम घेतात. तसेच गेली ६ वर्षे, ते स्टॉकहोम स्कूल ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने स्वीडिश कंपन्यांमधील उच्च संभाव्य व्यवस्थापकांसाठी कार्यकारी शिक्षण कार्यक्रमांतर्गत टॅलेंट मॅनेजमेंट, इंडस्ट्रियल रिलेशन्स आणि संपूर्ण भारतातील CSR या विषयात अभ्यासक्रम घेणारे नियमित प्राध्यापक आहेत. श्री गांगल सध्या ठाणे जनता सहकारी बँकेचे चेअरमन आहेत.



# श्री. प्रभाकर पाटील

श्री. प्रभाकर पाटील हे २८ वर्षांचा कठिण अनुभव असलेले उत्कृष्ट मानवी संसाधन (एचआर) व्यावसायिक आहेत. ते सध्या रिलायन्स रिटेलमध्ये प्रमुख-ईआर आणि कंप्लायन्सचे पद हाताळत आहेत.

सन १९८४ मध्ये त्यांनी एम/एस जीटीसी इंडस्ट्रीस एलीडी. येथे कार्यकारी अधिकारी म्हणून मानवी संसाधन (एचआर) प्रवासाला सुरुवात केली. नंतर ते एस.बी.रेशेलर्स पीवीटी. एलटीडी. मध्ये रुजू झाले. तद्नंतर, सोमा टेक्सटाइल अँड इंडस्ट्रीज, एचआर जॉन्सन इंडिया लिमिटेड, सीग्राम इंडिया प्रा. लि. ते २००७ मध्ये डेप्युटी जनरल मॅनेजर म्हणून रिलायन्समध्ये रुजू झाले. सध्या ते रिलायन्स रिटेलचे वरिष्ठ उपाध्यक्ष आहेत. त्यांचे नाव मानव संसाधन उद्योगातील सुप्रसिद्ध ईआर आणि अनुपालन तज्ञ पैकी एक म्हणून घेतले जाते.

श्री. प्रभाकर हे मुंबई विद्यापीठाच्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीजमधून लेबर स्टडीजचे पदवीधर आहेत. त्यांनी वाणिज्य शाखेत पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. शिवाय, त्यांनी शिवाजी विद्यापीठातून एल.एल.बी. पूर्ण केले आहे. त्यांनी मुंबईतून इंडस्ट्रियल रिलेशन आणि मानवी संसाधन व्यवस्थापनमध्ये (एचआर मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमाही) घेतला आहे. या व्यतिरिक्त, त्यांनी DNV मधून QSE आणि HACCP ९००० अंतर्गत ऑडिटर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

त्यांना शिकण्याची फार आवड आहे. ते स्वतःला आजीवन विद्यार्थी समजतात. सध्या, ते पीएचडी करत आहेत आणि त्यांनी याच क्षेत्रातील लक्षणीय शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांना प्रवास करायला आणि नवीन ठिकाणे शोधायला आवडतात. गाणी ऐकणे, नाटक बघणे आणि ट्रेकला जाणे, हे त्यांचे काही आवडते विरंगुळे आहेत. ते आपल्या मुलासाठी आणि मुलीसाठी एक आदर्श पिता आणि पत्नीसाठी एक अतिशय प्रेमळ पती आहेत. कठोर परिश्रम आणि धडपड यावर विश्वास ठेवणारे असे अत्यंत निर्मळ आणि सुस्वभावी प्रभाकर पाटील हे मानव संसाधन व्यावसायातील तरुण पिढीला प्रेरणा देणारे एक प्रणेते आहेत.



# श्री. राजेश बागवे

श्री. राजेश बागवे ह्यांनी गेली ३२ वर्षे इंजिनियरींग, फार्मा, आयटी, स्टॉक एक्सेंजेस, आरोग्य सेवा आणि रासायनिक उद्योग यांसारख्या विविध उद्योगांमध्ये मानवी संसाधनचे कार्याध्यक्ष म्हणून काम केलेले आहे.

सन २००० पासून ते मानवी संसाधनचे (एचआर) नेतृत्वाची भूमिका बजावत आहेत आणि अशा प्रकारे विविध यशस्वी ब्रँड आणि संस्थांचा भाग बनले आहेत आणि संस्थेची कार्यक्षमता वाढवण्यास व वेगळेपणा टिकवण्यास, सामान्य लोकांचे कल्याण आणि विकास करण्यास सक्षम आहेत.

मुंबईतील सुशिक्षित आणि नम्र परिवार पार्श्वभूमीतून ते लहानाचे मोठे झाले आहेत आणि १९७० आणि ८० दशकाच्या अर्थव्यवस्थांचा अनुभव घेत त्यांनि शालेय शिक्षण आणि पदवी मुंबईत पूर्ण केली.

एमआयएलएस मधून सन १९८८-९० च्या बॅच मधून एम.एल.एस. केले आहे आणि सराईतपणे मानवी संसाधनचे कार्य प्रतिष्टीत संस्थांमध्ये हाताळले आहे.

त्यांनी प्रेसिसिओन फास्टेनेर्स एलटीडी(अन्ब्राको), फुलफोर्ड इंडिया एलटीडी, बोहेरिन्गेर मॅनहाइम इंडिया लिमिटेड , निकोलस पिरामल इंडिया एलटीडी सारख्या नामांकित संस्थात काम करून उत्तरोत्तर प्रगती केली.

सन २००० पासून सीमेन्स निक्सडोर्फ इंडिया एलटीडी, नॅशनल स्टॉक एक्सेंजेस (NSE) ऑफ इंडिया एलटीडी, सीमेन्स एंटरप्राइज कम्युनिकेशन पीवीटी एलटीडी, मल्टी कोमोडीटी एक्सेंजेस (MCX) एलटीडी, मेट्रोपोलिस हेल्थकेअर एलटीडी मध्ये एचआर प्रमुख म्हणुन काम केले आणि सध्या गार्ग ह्युटेनस अल्बर्टस मध्ये कार्यरत आहेत.

औद्योगिक संबंध परीस्थीती हाताळण्यात पारंगत झाल्यामुळे आणि कामगार कायद्याची नीट समज असल्यामुळे ते आवश्यक सुसंवाद साधून औद्योगिक शांतता आणि उत्पादनक्षमता वाढवू शकले. कामगार आयुक्त, ग्रोसरी बोर्ड ऑफ माथाडीस, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी विभाग, कारखाना निरीक्षक व ग्रामपंचायत या कार्यालयांशी सकारात्मक संबंध देखील प्रस्थापित करू शकले.

एमआयएलएस ने त्यांना कामगारांच्या फायद्याच्या दृष्टीने अकुशल आणि अर्धकुशल कामगारांना कुशल करण्यासाठी प्रशिक्षित केले. कोरोना रोगराईच्या वेळी आदिवासी समाजाच्या पाठी उभे राहून त्यांनी महिन्याभराचे अन्नधान्य दिले आणि त्यांना नियमीत रोजगार मिळावा म्हणून प्रयत्न केले. कामगार कायद्याचे व्यवहारिक ज्ञान वापरून, त्यांनी सर्वोत्तम पद्धती, प्रक्रिया आणि धोरणात्मक उपाय करून लोकांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या सोडवल्या.

एमआयएलएस, जम्मु अँड काश्मिर युनिवर्सिटी, आयआयटी महाराष्ट्र या संस्थेशी ते शैक्षणीक दृष्ट्या संबंधित आहेत, अशा प्रकारे राष्ट्रीय एकात्मता, औद्योगिक व्यवस्थापन व औद्योगिक विकास यासाठी त्यांनी कार्य केलेले आहे.



# डॉ. राज पांड्या

डॉ. राज पांड्या हे सर्जनशील आणि उद्योजकीय विचारसरणीचे उत्कृष्ट व्यावसायिक नेते आहेत. त्यांच्याकडे कार्यकारी नेतृत्व, व्यवसाय परिवर्तन,विलीनीकरण आणि अधिग्रहण यांचा २८ वर्षांहून अधिक अनुभव आहे. ते मोठ्या एंटरप्राइझच्या ग्राहकांना त्यांची व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्यात मदत करत आहे. ते L&T इन्फोटेकच्या पहिल्या १० संस्थापक सदस्यांपैकी एक महत्त्वाचे प्रणेते आहेत.

सध्या ते L&T तंत्रज्ञान सेवांसाठी "कंट्री हेड - अमेरिका" म्हणून कार्यरत आहेत आणि कंपनीच्या पुढील प्रगती पथावर पोहोचण्याची रणनीती आणि अंमलबजावणी योजनेवर काम करत आहेत.

ते जागतिक स्तरावर महसूल/नफा वाढीच्या मजबूत ट्रॅक रेकॉर्डसाठी तसेच विक्री, वितरण आणि लोक व्यवस्थापन कार्यांमध्ये तज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांना सर्वोत्कृष्ट आयटी लीडरपैकी एक म्हणून ओळखले जाते आणि डिजिटल, डेटा अँनालीटीक्स, क्लाउड आणि ईआरपीमध्ये निव्वळ नवीन क्षमता निर्माण आणि विक्रीसाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. खरे उत्प्रेरक आणि विश्वासू भागीदार म्हणून त्यांना सीईओ, सीआयओ/सीटीओ स्तरावरून अनेक ग्राहक संस्थेच्या मान्यताही मिळाल्या आहेत.

डॉ. राज यांनी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीज, मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी SAP India आणि SAP Americas प्रमाणपत्रे मिळवली आहेत. त्यांनी मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) मधून आयओटी आणि डेटा सायन्स प्रमाणपत्रे घेतली आहेत.

व्यवसाय तसेच एचआर तंत्रज्ञानात उत्सुक असलेल्या तरुण पिढीसाठी ते खरोखरच प्रेरणास्थान आहेत.



# श्री. क्लिफर्ड मोहन पै

एक अनुभवी व्यावसायिक आणि मानवी संसाधनचे विशेषज्ञ, क्लिफर्ड मोहन पै यांना अडीच दशकांहून अधिक सेवा, जैवतंत्रज्ञान, क्लिनिकल रिसर्च, फार्मास्युटिकल्स, एफ.एम.सी.जी., आय.टी/आय.टी.ई.एस. आणि प्रारंभिक उद्योगांचे वातावरण यासारख्या अनेक उद्योगांमधील विविध प्रस्थापित संस्थांमध्ये वरिष्ठ नेतृत्वाच्या भूमिकेत काम करण्याचा अनुभव आहे.

त्यांनी प्रभावीपणे मानवी संसाधनांचा संघ (एचआर) तयार केला आणि त्याचे नेतृत्व करून तो विस्तृत केला आहे. मानवी संसाधन (एचआर) कार्याचे योग्य व्यस्थापन करून त्याची संपूर्ण जबाबदारी सांभाळून जागतिक स्तरावर मानवी आणि व्यवसायिक भांडवलाची गतिशील वाढ असलेल्या व्यवसायिक धोरणांसोबत, मानवी संसाधनाची योग्य सांगड घातली आहे. ग्लेनमार्क, कॅडबरी, रिलायन्स लाइफ सायन्सेस, आणि ब्लू डार्ट यासारख्या नामांकित ब्रँड्समधील अग्रगण्य संस्थासाठी क्लिफर्ड यांनी परिवर्तन तथा वाढीची रणनीती आखून संस्थेच्या जागतिकीकरणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

ते महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीज (MILS) चे माजी विद्यार्थी असून सध्या उपाध्यक्ष, मानवी संसाधन (HR) प्रमुख – एपीएसी आणि ईएमईए आणि ग्लोबल हेड - कर्मचारी संबंध, इन्फोसिस बीपीएम (Infosys BPM) साठी कार्यरत *आहेत.* संपूर्ण कर्मचार्यांचे जीवनचक्र समाविष्ट असणार्या एकूण मानवी भांडवल व्यवस्थापनासाठी ते जबाबदार आहेत. ते कर्मचारी महत्त्वमूल्य मजबूत करण्यासाठी "शेअर ऑफ व्हॉईस" तयार करण्यावर लक्ष केंद्रित करतात. इन्फोसिस संस्थेच्या समूह स्तरावरील व्यवस्थापन परिषदेमध्ये धोरणात्मक सदस्याची प्रभावीपणे भूमिका निभावून उत्पादकता आणि प्रक्रिया उत्कृष्टतेची ते उत्तम सांगड घालतात.

क्लिफर्ड हे नामांकित एचआर फोरम्स, कॉलेजेस आणि मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये एक नियमित वक्ता आहेत. शिकवण्याची आवड असल्यामुळे, "एक चांगला प्रशिक्षक खेळ बदलू शकतो, एक उत्तम प्रशिक्षक आयुष्य बदलू शकतो" यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. जगभरातील अनेक संस्था आणि व्यवस्थापन संघटनांतील त्यांच्या व्यावसायिक योगदानासाठी ते मान्यताप्राप्त जागतिक मानवी संसाधन नेता (एचआर लीडर) आहेत. ते क्राइस्ट युनिव्हर्सिटी, लवासा येथे शिक्षण मंडळाचे सदस्य होते आणि अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांना ते सल्ला देतात, तसेच अनेक वरिष्ठ एचआर व्यावसायिकांना प्रशिक्षण देतात.

ते एचआर सर्टिफिकेशन इन्स्टिट्यूट, अलेक्झांड्रिया, यूएसए द्वारे ‘‘जीपीएचआर’’ (एचआरमध्ये ग्लोबल प्रोफेशनल) प्रमाणित व ‘‘आंतरराष्ट्रीय कोच फेडरेशन’’ तर्फे पीसीसी प्रशिक्षित आहेत. क्लिफर्ड यांना ग्लोबल एसएचआरएम कॉन्फरन्स – यु.एस.ए (USA) आणि इंडिया एच.आर समिटमध्ये त्यांचे विचार मांडण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. जीपीएचआर प्रमाणित सामग्रीचे पुनरावलोकन आणि नूतनीकरण करण्यासाठी HRCI ने त्यांच्या मुख्यालयात आमंत्रित केलेले ते एकमेव भारतीय प्रतिनिधी होते. त्यांना हार्वर्ड स्क्वेअर येथील लीडर्स एक्सलन्सचे अध्यक्ष डॅन होयेर यांनी केवळ महत्वाच्या सदस्यांसाठी असलेल्या क्लब MLESM (मेंबर ऑफ लीडर्स एक्सलन्स - हार्वर्ड स्क्वेअर) येथे आमंत्रित केले होते.

**स्व. नारायण मेघाजी लोखंडे**
**कामगार शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र**
(महाराष्ट्र सरकार)

डी.सी.रोड, परळ, मुंबई-४०००१२
संपर्क : 02224125330 / 02224123035
ईमेल आय डी : mils@mtnl.net.in
वेबसाईट : www.mils.co.in

एमआयएलएस प्लेसमेंट सेल

एलएनएमएल एमआयएलएस प्लेसमेंट सेल

एलएनएमएल एमआयएलएस